# नव्वोदत्तर आर्थिक बदल आणि स्त्री

**डॉ. विनिता हिंगे**
यशोदा गर्ल्स आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
नागपूर

---

भारतात 1990 नंतर खुल्या आर्थिक धोरणामुळे वेगवान बदल झाले. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण आणि यामुळे जाहिराती, प्रसारमाध्यमांचा प्रसार वेगाने वाढला. संगणक, इंटरनेट यांच्या गतिमानतेमुळे शहरात रोजगार निर्मिती निश्चितपणे वाढली. स्त्रियांनी त्याचा लाभ घेतला. स्त्रियांचे अर्थार्जन आवश्यक झाले, त्यावर आता प्रश्नचिन्ह उरले नाही. आय.टी.बी.पी.ओ. प्रसार माध्यमे, मार्केटिंग अशी अनेक क्षेत्रे स्त्रीने काबीज केली. तिला काही प्रमाणात आर्थिक स्वातंत्र्यही मिळतांना दिसते. परंतु यामागील तिच्या समस्यांचा नव्याने विचार करण्यात येऊ लागला.

मराठी कादंबरीत नव्वदोत्तर काळात शहरी स्त्रीला नव्याने भेडसावणाऱ्या समस्यांचे चित्रण दिसते. शांता गोखले यांच्या 'रीटा वेलिणकर (1990) मध्ये बदलती कार्यसंस्कृती दृष्टीस पडते. नायिका रीटा हिचा काळ जुना आहे. परंतु तिच्यापेक्षा वयाने बरीच लहान असणारी संगीता, मार्केटिंगच्या क्षेत्रात काम करणारी आहे. तैथील स्पर्धात्मक जगाला ती सामोरी जाते. युनियन व मॅनेजमेंट तसेच या दोघांनाही नको असणारे स्त्रियांचे मंडळ आहे व संगीता त्यात सक्रिय आहे. पुरुषांकडून त्रास होणाऱ्या स्त्रियांना मानसिक आधार देणारे मंडळ पण त्यात काम करणाऱ्या 'संगीता'ला तिची नोकरी गमवावी लगते.

नव्वदोत्तर काळात आर्थिक तणाव, महागाई वाएत आहे. शहरात नोकरी मिळवण्यास तरुणी धडपडत आहेत. दवाखान्यात काम करणाऱ्या 'नर्सेस' बाबत, रीटा म्हणते, 'विरंगुळा शोधणारे हात चकवायचे असतात'. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवतांना मानसिक त्रास अटळपणे सहन करावा लागतो हे चित्रण अनेक कादंबरीत आढळते. प्रा.वंदना भागवत लिहितात, ''समाजाच्या रुढींना नाकारुन, संस्थात्मक ढोंगीपणाशी असलेला रीटाचा संघर्ष असो, कोणतेही बळ पाठीशी नसतांना स्त्रियांवरच्या अन्यायाविरुद लढण्याची संगीताची हिंमत असो किंवा नवरा नावाचे पैसे कमवणारे उद्दाम यंत्र सांभाळून विद्रोह, कणा ाब्दांमधून जपण्याचा आटापिटा करणारी सरस्वती असो, तिघीजणी जे आत्मभान कमावतात त्याला आता कशाचेच भय नाही.[1] अर्थार्जन करीत आत्मभान प्राप्त करणाऱ्या स्त्रिया ते टिकवण्यासाठी देखील कष्ट घेतात. 'भिन्न' या कादंबरीत कविता महाजन यांनी शहरी स्त्रियांचे कार्यक्षेत्र, अर्थलाभ व ताणतणाव स्पष्ट करतात. त्यातील 'रचिता शिर्के' क्लबमध्ये साडेनऊ ते साडेपाच या वेळात व्यायाम शिकवते. विभा ही प्राध्यापक आहे. प्रतिक्षा कमल समाजसेविका आहे. रचिताचे उद्‌गार, ''पैसा आणतेय, म्हणून सगळं फाटलेलं नाही, नोटांनी किती गोष्टी बेमालूम रफू केल्या जातात'.[2] हे नव्वदोत्तरी शहरी स्त्रीचे प्रातिनिश्चिक उद्‌गार ठरतात.

स्त्री–पुरुष दोघांनाही नोकरी वा व्यवसायात वाढत्या स्पर्धेमुळे, बदलत्या कार्यसंस्कृतीमुळे अधिक वेळ देणे गरजेचे झाले आहे. स्त्रीची कुटुंबाची जबाबदारी कमी न झाल्याने, तिला दुहेरी ताण सोसावा लागतो. 'भिन्न' मधील अनेक व्यक्तिरेखांच्या चित्रणातून कविता महाजन हे स्पष्ट करतात.

बदलत्या नीतीमुल्यांमुळे, प्रसार माध्यमांमुळे आलेल्या पाश्चिमात्य मूल्यांमुळे तरुणींच्या अपेक्षांमध्ये बदल होत आहेत. विश्राम गुप्ते यांच्या 'नारी डॉट कॉम' मधील कॉलेज तरुणी 'कॉल गर्ल' म्हणून काम करु लागते, ती याचमुळे देखाव्यासाठी, प्रसिध्दीसाठी, समाजकार्य करणाऱ्या स्त्रिया 'भिन्न' मध्ये दिसतात. 'रंगीत' पत्रकारही आहे. ''स्त्रियांच्या श्रमाचं झालेलं लैंगिकीकरण धोकादायक आहे'' हे विचार कादंबरीत कविता महाजन स्पष्ट करतात. यामुळे पुष्पा भावे समर्पकपणे लिहितात, ''या दोनही कादंबऱ्या स्त्रिया हलकंफुलकं लिहितात, या आरोपाला तर उत्तर होत्याच. दोन्ही कादंबऱ्या मागील विषयाचा लेखिकेचा अभ्यास स्पष्ट होता.''[3]

नव्वदोत्तर काळात पर्यटन व्यवसाय वाढला पण आदरातिथ्यासाठी, मनोरंजनासाठी स्त्रियांचा वापर वाढीव लागला. अर्थात उच्च शिक्षण घेणाऱ्या, संशोधन करणाऱ्या त्यासाठी परदेशात जाणारी स्त्रीचे चित्रणही नव्वदोत्तर कादंबरीत सेते. आशा बगे यांच्या सुचरिताच्या रुपात. 'सेतू' मधील सुचरिता ही करिअरिस्ट, उच्चपदस्थ स्त्री आहे. तिचे प्रश्न अर्थातच निराळे तर मिलिंद बोकील यांच्या 'रण' मधली नमिता शहरात चालणे, बससाठी ताटकळणे, उभ्याने प्रवास करणे, ट्रेनच्या गर्दीत धक्काबुक्की करत प्रवास करते. मनात मुलाची काळजी करते. अर्थार्जन करणाऱ्या शहरी स्त्रीचे शारिरीक व मानसिक ताण, वाढत्या जबाबदाऱ्या, सतत स्वतःला सिध्द करीत राहणे येथे नोंदवले गेले आहे.

आर्थिक बदलांसोबत चंगळवाद नव्वदोत्तर काळात सर्वत्र पसरला. रेखा नैजल यांच्या 'प्रस्थान' मधील उच्चवर्गीय 'मेघना' चंगळवादाच्या जाळयात अडकलेली आहे. ती प्रातिनिश्चिक आहे असे म्हणता येते. विश्राम गुप्ते यांचे उद्‌गार याबाबत अत्यंत साथर्ध आहेत, ते असे – 'हया शतकातल्या माणसाचं व्यक्तिमत्व एकोणिसाव्या किंवा विसाव्या शतकातल्या माणसाच्या व्यक्तिमत्वासारखं सुबोध आणि सुघटित राहिलं नाही. ते पराकोटीचं व्यामिश्र आणि विस्कळीत झालं आहे. माणसाभोवतालची व्यवधानं, मीडिया, मॅनेजमेंट, मनी आणि मार्केटची प्रस्थाने वाढलीयत. त्याचा परिणाम माणसाचं अंतर्मन बदललं. बाहय बदल झाले की अंतर्गत बदलही घडून येतात. हे भौतिकवादाचे प्राथमिक गृहित आहे.[4]

आर्थिक विषमता वाढल्याचे मराठी कादंबरीतील अनेक व्यक्तिरेखांच्या चित्रणातून स्पष्ट झाले आहे. शहरातील उच्चवर्गीय स्त्रिया व आत्यंत्यिक गरीबी भोगणाऱ्या स्त्रिया शहरातून दिसतात. आर्थिक बदलांमुळे स्त्रीचे व्यक्तिगत जीवन त्याचबरोबर तिचे कौटुंबिक जीवनही बदलले आहे. त्यावर कादंबरीने प्रकाश टाकला व त्याची कारणमिमांसा केली. साहित्याने केवळ वास्तवाचे चित्रण न करता, समाजाला दिशा देणे अपेक्षित आहे, ही अपेक्षा नव्वदोत्तर कादंबरी पूर्ण करतांना दिसते. शहरातील स्त्री आर्थिक स्वावलंबन मिळवतांना किती प्रश्नांना सामोरी जाते यावर विचारमंथन कादंबरीतून घडते, हे विशेष.

संदर्भ :–

1) प्रा.वंदना भागवत, मिळून साऱ्याजणी, जाने.2010 पृ.6
2) कविता महाजन, भिन्न, राजहंस प्रकाशन, पुणे 2007, पृ.14
3) पुष्पा भावे, ''स्त्रीच्या आत्मभानाचे व विश्वभानाचे बहुपेडी अविष्कार –पुण्यभुषण' 83 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन स्मरणिका, पुणे 2011, पृ.84
4) विश्राम गुप्ते, 'आठवण', 'अक्षर' दिवाळी 2011, पृ.119